gyan prakash FOUNDATION

जिल्हा परिषद परभणी

EdelGive Foundation
An Edelweiss Initiative

# शिक्षण प्रभा

जानेवारी २०२४ । अंक पहिला । खासगी वितरणासाठी । पाने ८

## मनोगत

### नवीन शैक्षणिक धोरणानुसार मुलांच्या शिक्षणात लोकसहभाग

भारताने सन २०१५ मध्ये शाश्वत विकासाचा जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम स्वीकारला आहे. सन २०३०पर्यंत (डउऋ ४) सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि निरंतर अध्ययनाच्या संधींना प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

केंद्र शासन व राज्य शासनाचा शिक्षण विभाग व प्रशासकीय व्यवस्था यासाठी काम करत आहे. त्यांच्या कार्यात पालकांनी सक्रिय सहभाग घेतल्यास सदर शैक्षणिक कार्यास गती मिळून लोकसभागातून शैक्षणिक संस्थांना भौतिक साधन सुविधांच्या मदतीने समृद्ध करता येईल. शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीमध्ये पालकांचे सहकार्य बहुमोलाचे ठरणार आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे आणि त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे हे राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे मूलभूत तत्व आहे. शिक्षक व पालकांनी मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये तसेच अभ्यास व अभ्यासेतर विकासात सक्रिय योगदान देण्याची आवश्यकता आहे.

सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक सुलभ करण्यासाठी तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करता येईल. तशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समाजाची व पालकांची मदत होऊ शकते. मुलांना अधिक ज्ञान समृद्ध करण्यासाठी गावामध्ये, वॉर्ड, शहर इत्यादी ठिकाणी

## ठळक घडामोडी

### गोवा राज्यसरकार आयोजित पथकाची परभणी जिल्ह्यास भेट



काही आठवड्यांपूर्वी समग्र शिक्षाचे गोव्यातील अधिकारी आणि अध्ययन क्वालिटी एज्युकेशन फाउंडेशनचे पथक यांनी महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्याला भेट दिली. ग्यानप्रकाश फाउंडेशन शिक्षणव्यवस्थेबरोबर करत असलेले काम बारकाईने जाणून घेणे हा या भेटीमागचा मुख्य उद्देश होता. सरकारी अधिकाऱ्यांना साहाय्य करणे, उच्च गुणवत्तेच्या शिक्षणाचा पुरस्कार करणे आणि सर्व मुलांच्या अध्ययन निष्पत्तीमध्ये सुधारणा घडवून आणणे हा जीपीएफच्या शिक्षणव्यवस्थेबरोबरच्या कामाचा भाग आहे.

ग्यानप्रकाश फाउंडेशन आणि अध्ययन क्वालिटी एज्युकेशन फाउंडेशन यांनी संयुक्तपणे राबवलेला हा उपक्रम असून त्यातून गोव्याच्या पथकाला परभणीतील शैक्षणिक प्रक्रिया सर्वंकषरित्या समजून घेता आल्या. शिक्षण परिषदांमध्ये सहभागी होणे, शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य समजून घेणे, पालक आणि जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांबरोबर संवाद साधणे, आणि वर्गप्रक्रियांचे निरीक्षण करणे, लर्निंग नॅव्हिगेटरसारख्या तंत्रज्ञानाचा त्यात होणारा वापर समजून घेणे या गोष्टींचा त्यात समावेश होता.

आपले ज्ञान आणि कौशल्ये यांची देवाणघेवाण करण्याचा एक उत्तम अनुभव यातून सर्वांना घेता आला. या अनुभवातून सदर पथकाला प्रभावी शैक्षणिक प्रक्रियांची विशेष माहिती करून घेता आली. तसेच गोव्यात या प्रक्रिया कशा अमलात आणता येतील हे ही समजून घेता आले. शिक्षण परिषदांविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना गट साधन व्यक्ती कुमारी लिन डिसूझा म्हणाल्या, सर्व शिक्षकांमध्ये एकी आहे ही गोष्ट मला अतिशय भावली. मुलांना चांगले शिक्षण देण्यावर या सर्व शिक्षकांचा अधिक भर असल्याचे दिसून येते.

लोकसहभागातून वाचनालय, बुक क्लब, पुस्तक वाटप इत्यादी गोष्टी सहज करता येऊ शकतात.

विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व व्यावहारिक ज्ञान कौशल्य व अनुभव विकसित करण्यासाठी समाजातील विविध व्यावसायिक घटक मदत करू शकतात. उदा. शेतकरी शाळेतील मुलांना विविध पिके, मातीचे प्रकार, कृषी पद्धतीची माहिती देऊ शकतात. माळी फुले, फुलांचे विविध प्रकार इत्यादींविषयी सांगू शकतात. यासाठी इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुट्टीच्या कालावधीत दहा दिवसांचा इंटर्नशिपसारखा उपक्रम आखून त्यामध्ये स्थानिक व्यावसायिक, जसे की - कुंभार, सुतार, माळी यांच्या मदतीने शिकण्याची संधी मिळू शकते.

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, बौद्धिक इ. स्वरूपात मुलांना आनंदी व समृद्ध जीवन उपलब्ध करून देणे लोकसहभागामुळेच शक्य होणार आहे. यातूनच पुढे भारताच्या शाश्वत विकासामध्ये योगदान देणे आपल्याला शक्य होईल.



**डॉ. प्रल्हाद खुणे,**
*वरिष्ठ अधिव्याख्याता,*
*जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी*

## त्रैमासिक शिक्षणप्रभा संदेश

परभणी जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी आपणा सर्वांकडून सुरू असलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सर्वप्रथम आपले मनःपूर्वक अभिनंदन! शिक्षण विभागातील प्रत्येक घटक त्या दृष्टीने काम करत असल्याचे प्रत्यक्ष क्षेत्रभेटीतून माझ्या निदर्शनास आले आहे. आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग व ग्यानप्रकाश फाउंडेशन यांच्या माध्यमातून याबाबत नियोजन करून राबविले जात आहे.

या सर्व प्रक्रियेत, मुलांचे शिक्षण गुणवत्तापूर्ण व्हावे यासाठी शिक्षकांबरोबर ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांच्यावरही जबाबदारी आहे. शिक्षक -पालक- विद्यार्थी एकत्र येण्याचा मंच म्हणजे त्रैमासिक शैक्षणिक पालक सभा होय. या माध्यमातून मुलांच्या शिकण्यामध्ये पालकांची काय भूमिका असावी याविषयी स्पष्टता येते. तसेच ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समिती, पालक यांनी एकत्र येऊन शाळांच्या गरजा निश्चित करून त्या पूर्ण केल्या पाहिजेत. ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येक मूल शिकत आहे की नाही याची जबाबदारी ग्रामपंचायतीने घेणे आवश्यक आहे. शैक्षणिक सुविधा पुरविण्याचे काम ग्रामपंचायतीचे आहे. यामध्ये वर्ग खोल्यांची दुरुस्ती, शैक्षणिक वातावरण व शैक्षणिक साहित्य देणे अशा मूलभूत सुविधा येतात.

मुलांच्या शिकण्यामध्ये शिक्षकांबरोबर पालकांची जबाबदारी महत्त्वाची आहे. शाळेमधले आठ तास सोडले तर इतर वेळी मूल घरी असतं. आपले मूल शिकत आहे की नाही हे शाळेतून आल्यानंतर पालकांनी पाहायला हवे. प्रत्येक मुलाला आपापल्या वर्गाच्या अध्ययन निष्पत्ती साध्य होत आहेत का याकडे शिक्षकांबरोबरच पालकांनी लक्ष द्यायला हवे. यासाठी ग्रामपंचायत, पालक व शाळा यांनी एकत्र येऊन मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणे गरजेचे आहे.

पुढील कामासाठी सर्वांना शुभेच्छा.



**-मा. श्री. डॉ. संदिप घोन्सीकर**
*(उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद, परभणी)*

शासनास स्वतःच्या सर्वच शासकीय शाळांना निकषाप्रमाणे अनुदान देणे आवश्यक असते. मुख्याध्यापकांना शाळेला मिळालेले शाळा व देखभाल दुरुस्ती अनुदान खर्च करताना कसरत करावी लागते. त्यामुळे गुणवत्तेविषयीचे उपक्रम मागे पडतात. दुर्गम भागात व छोट्या शाळांमध्ये याबाबत केवळ अनुदानाच्या अभावी योग्य वेळी काम होणे मागे पडते.यावेळेस पालक व समाजाने पुढे येऊन शाळेला लोकसहभाग मिळवून दिल्यास शाळेत प्रगतीला पूरक असा एखादा गुणवत्तापूर्ण उपक्रम मोठ्या प्रमाणात करता येतो. शाळेची भौतिक श्रीमंती गुणवत्तेसाठी पूरकच असते.यामध्ये आरटीई २००९च्या शालेय निकषांसोबत शैक्षणिक तंत्रज्ञान साहित्याचीही भर टाकता येते. एकंदरीत शाळेसाठी लोकसहभाग हा संस्कार समाजात रुजवावा लागेल. ग्यानप्रकाश फाउंडेशन या संस्थेच्या वतीने पाथरी तालुक्यात आणि संपूर्ण परभणी जिल्ह्यात शैक्षणिक ग्रामसभांच्या माध्यमातून यासाठी चालू असलेले प्रयत्न स्तुत्य आहेत.



**-श्री. मुकेश राठोड**
*(विस्तार अधिकारी, पाथरी, जि. परभणी)*

## यशाची गुरुकिल्ली :– वर्गप्रक्रियेतील बदल



जूनच्या सुरुवातीला इयत्ता सातवीचा वर्ग माझ्याकडे आला. त्यावेळी सर्वप्रथम मुले कोणत्या अध्ययन निष्पत्तीच्या कोणत्या पातळीवर आहेत याची मी चाचपणी केली. उदा. मुलांचे पाढे, हस्ताक्षर, मराठी व इंग्रजी वाचन (व्हिडीओ), गणिती क्रिया (पायाभूत क्रिया) यांचं एक रेकॉर्ड तयार केलं. प्रत्येक मुलाची पोर्टफोलिओ फाईल तयार केली. त्यानुसार ठराविक कालावधीनंतर त्यात काही सुधारणा झाल्या आहेत का हे सतत तपासून पाहात व निरीक्षण करत गेलो. त्यामध्ये मुलांवर अधिक काम करण्याची गरज जाणवू लागली. यासाठी प्रत्येक महिन्याला होणाऱ्या शिक्षण परिषदा तसेच ग्यानप्रकाश फाउंडेशन व गटशिक्षणाधिकारी पठाण साहेब यांच्याकडून प्रेरणा व मदत मिळत गेली. यावरून अध्ययन निष्पत्तीला अनुसरुन व क्षमता आधारित शिक्षणावर भर देऊन त्याप्रमाणे प्रत्येक मुलाचे नियोजन करायचे ठरवले. वर्गप्रक्रिया आखताना  वैयक्तिक, मोठे गट, छोटे गट तसेच विषयमित्र अशा प्रकारचे नियोजन केले. मुले आपापल्या गतीने शिकू लागली. कोणावरही अनावश्यक दबाव नसल्याने प्रगती करू लागली. आपापल्या गटात एकमेकांबरोबर पाढे, वाचन, हस्ताक्षर या बाबतींमध्ये निकोप स्पर्धा करू लागली. विषयमित्रांना आपला विषय वर्गात सर्वांना व्यवस्थित आला पाहिजे असे वाटू लागले. त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न करायला सुरुवात केली. वर्गात हा अतिशय मोलाचा बदल घडलेला दिसून आला.

जुलै महिन्यात अध्ययन निष्पत्तीनुसार वर्ग रचना, अध्ययन याविषयी सोनपेठ इथे झालेल्या अध्ययन निष्पत्ती कार्यशाळेत मनोगत व्यक्त करत असताना मी बोललो होतो की, या पद्धतीने अध्यापन करताना मला भरपूर वेळ लागत आहे. त्यावेळी आमचे मार्गदर्शक गटशिक्षणाधिकारी पठाण साहेब म्हणाले होते की, सध्या वेळ लागेल. नंतर मात्र तुमचा वेळ कमी कमी होत जाईल. आज माझ्या असे लक्षात आले आहे की, या पद्धतीमुळे पुढे जाऊन खरंच खूप वेळ कमी लागतो. वेळेची बचत होते. मी जूनपासून माझी वर्गप्रक्रिया अध्ययन निष्पतीनुसार चालवत आहे. यापुढेही यावर मला बरेच काम करावे लागणार आहे यात शंका नाही. तरीही आजच्या घडीला ५०% विद्यार्थी यात चांगले रूळले आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांनादेखील सोबत घेऊन काम चालू आहे. वर्गप्रक्रियेमध्ये यामुळे मोठे बदल झाले आहेत. आता वर्गात अध्यापन नाहीतर अध्ययन चालते.

सर्व विषयासाठी वर्गातील मुलांचे तीन किंवा चारचे गट पाडण्यात आले. गटा-गटात अध्ययन अनुभवावर चर्चा करणे, मत मांडणे, प्रश्न विचारणे व उत्तर देणे, प्रश्न सोडवणे, उत्तर देताना नवीन विचार करू पाहाणे, अभ्यासाबाहेरचे प्रश्न विचारणे, अभ्यासात मागे असलेल्या मुलांना सोबत घेणे या गोष्टी घडू लागल्या. आता विद्यार्थ्यांचा रोजचा अभ्यासही गटप्रमुख विचारून घेतात. विषयमित्राची यात भरपूर मदत होते. यातूनच मुलांचे शिक्षकावरचे म्हणजे माझ्यावरचे अवलंबित्व कमी होऊन ती आपापले शिकू लागली. अधिक व्यक्त होऊ लागली.

गणित विषयाची वर्गप्रक्रिया चालू असताना माझ्या असे लक्षात आले की, गणित शिकण्याची मुलांची गती वेगवेगळी आहे. त्यानुसार मी फक्त गणित विषयाचे तीन वेगळे गट तयार केले. प्रत्येक गटाला त्यांच्या गतीनुसार शिकण्याची संधी निर्माण करून दिली. रोजच्या तासिकेमध्ये प्रत्येक गट तीन वेगवेगळे घटक शिकत असे. यात माझी थोडी कसरत होत होती; पण या पद्धतीमुळे मुलांच्या गणित शिकण्याच्या गतीमध्ये खूप फरक पडला आहे असे काही दिवसातच माझ्या लक्षात आले. सुरुवातीला मी फक्त त्यांना प्रेरणा दिली. मग गटागटामध्ये निकोप स्पर्धा निर्माण झाली. स्वयं-अध्ययनाची सवय लागल्याने मुलांचे आकलन आपसूक वाढत गेले. माझा गणित व भाषा विषयाचा पाठ्यक्रम उत्तम प्रकारे लवकर पूर्ण झाला. यातील सर्व अध्ययन निष्पत्ती मुले  समजून घेऊन शिकली.

क्षमता आधारित शिक्षण व अध्ययन निष्पत्तीला अनुसरून वर्गप्रकिया असेल तरच मुले खऱ्या अर्थाने शिकतात हे आज माझ्या लक्षात आले आहे.

**श्री. अवधूत गिरी**
*इयत्ता सातवी*
*जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पोहंडूळ.*
*केंद्र :- खडका तालुका सोनपेठ*

## इतिहासाचा जिवंतपणा



मुलांचे शिकणे आनंददायी व्हावे यासाठी त्यांचा शिकण्यातला रस टिकून राहायला हवा, त्यांच्यातील चौकस वृत्तीला खतपाणी मिळायला हवे, आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे त्यांना शोधता यायला हवीत. यासाठी वर्गातील शिकवणे एकसूरी न ठेवता त्यात विविध उपक्रमांचा समावेश करणे, मुलांमधील कुतूहल जागृत

करणे आवश्यक असते. त्यासाठी श्रीमती मंदा भरोसे या शिक्षिकेने इयत्ता सहावीच्या वर्गात कोणती पद्धत अवलंबली हे त्यांच्याच शब्दांत खाली वाचू या.

इतिहासाचा प्रत्यक्ष अभ्यास करताना अभ्यासक काही भौतिक साधनांचा वापर करतात. वर्गात शिकवताना मात्र त्याविषयी नुसते तोंडी सांगितले किंवा फळ्यावर, तक्त्यावर लिहून दाखवले तर त्या शिकवण्यात जिवंतपणा वाटत नाही. त्यापेक्षा इतिहासासंबंधित साधने मुलांना प्रत्यक्ष हाताळायला मिळाली तर त्याचा त्यांना चांगला फायदा होतो हे वर्गात प्रत्यक्ष अनुभवातून शिकवतांना मला दिसून आले. तसेच वेगवेगळ्या शाळांमध्ये काम करताना अनुभवता आले.

मुलांना या साधनांची ओळख इंटरनेटवरून करून देता येते. इतिहासकालीन नाणी, शिलालेख, ताम्रपट, भूर्जपत्रे, किल्ले अशा विविध साधनांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे युट्यूब व्हिडिओसारख्या माध्यमातून शक्य होते. परंतु यातील काही साधने प्रत्यक्ष हाताळायला मिळाली तर... या विचाराने मी जिल्हा परिषद शाळा रायपुर व शेंद्रा इथे इयत्ता सहावीच्या इतिहास विषयाचा हडप्पा संस्कृती हा पाठ कृतीयुक्त पध्दतीने घेण्याचा प्रयत्न केला.

हडप्पा संस्कृती या पाठाच्या सुरवातीलाच उत्खनन हा शब्द आलेला आहे. आपण या शब्दाकडे अजिबातच लक्ष न देता पाठ चालू करतो आणि हडप्पा नाव कसे पडले, तिथली घरे, नगररचना इत्यादी बोलतो. परंतु या पाठाच्या सुरूवातीला उत्खनन ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी मी पुढे दिलेला उपक्रम राबवला. यातून हडप्पा संस्कृती व नगररचना समजून घेण्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली.

मी माझ्याकडे उपलब्ध असलेले सर्व साहित्य जमा केले. यात जुने दागिने, जुन्या खापराच्या वस्तू, जुनी नाणी इत्यादी वस्तू घेऊन त्यांचे एक मोठे गाठोडे तयार केले. शाळेत गेल्यानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना बोलते केले. आपण शाळेत वृक्षारोपण करू या असे सांगून त्यासाठी मला तुमची गटाने मदत हवी आहे असे त्यांना सांगितले. मग विद्यार्थ्यांचे गट तयार करून त्यांना खड्डे खोदायला सांगितले. अर्थात वर्गात जाण्यापूर्वी मी पूर्वतयारी करून ठेवली होती. माझ्या गाठोड्यातील थोडे-थोडे साहित्य शाळेच्या परिसरात काही ठिकाणी खड्डे करून पुरून ठेवले होते आणि विद्यार्थ्यांना सूचना देऊन त्या-त्या ठिकाणीच वृक्षारोपणासाठी खड्डे करायला सांगितले होते.

विद्यार्थी गटाने खड्डे करत असताना त्यांना अचानक काही साहित्य सापडू लागले. एक गटाला जुने नाणे, दागिने सापडले. ते लगेच माझ्याकडे त्या वस्तू घेवून आले. थोड्या वेळाने दुसरा गट, खापराच्या वस्तू घेऊन आला. मुलांना आश्चर्य वाटले. सर्व गट आपल्याला सापडलेले साहित्य घेऊन वर्गात आले आणि त्याविषयी चर्चा करू लागले. मग मी विद्यार्थ्यांना सापडलेल्या सर्व साहित्याच्या आधारे जुने दागिने, नाणी, मातीच्या वस्तू, हडप्पाकालीन भांडी, मूर्ती, मुद्रा यांची इंटरनेटवर मिळालेली रंगीत चित्रे डाऊनलोड करून विद्यार्थ्यांना दाखवली. त्यातून त्यांना हडप्पा संस्कृतीतील घरे, नगररचना, लोकजीवन, व्यापार कसा असू शकेल याविषयी स्वतःचे विचार व्यक्त करण्यास त्यांना अवकाश दिला.

यानंतर मुले स्वत: आपल्या घरातील पालकांशी बोलून, गावातून व समाजातून इतिहास शोधण्याचा प्रयत्न करतांना दिसून आली. यातून पालकांचा शिक्षणात सहभाग घडून आला, शिक्षणाची गुणवत्ता वाढण्यास मदत झाली आणि मुलांमध्ये इतिहास विषयाची आवडही रूजली.

**श्रीमती मंदा बाबाराव भरोसे**
*विषयतज्ञ शहर साधन केंद्र, परभणी*

## अभ्यासगटातून समुदाय सहभाग



मुलांच्या शिक्षणात समुदायाची भूमिका महत्त्वाची असते. एकदा एखाद्या गावाने आपल्या गावातील मुलांचे शिक्षण हे एक महत्त्वाचे ध्येय मानले की, बदल होणे अपरिहार्य आहे. परभणी जिल्ह्यातील नांदगाव गावात अलीकडेच घडलेली ही गोष्ट याचे उत्तम उदाहरण आहे.

परभणी तालुक्यात असोला केंद्रातील नांदगावच्या जिल्हा परिषद शाळेत घडलेली ही घटना आहे. या शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समितीची प्रक्रिया उत्तम प्रकारे राबवली जाते. त्यांच्या नियमित मासिक बैठका होतात. तसेच सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार दरवर्षी शाळा व्यवस्थापन समितीची म्हणजेच एसएमसीची पुनर्रचना केली जाते. या समितीच्या एका बैठकीत पालकांना आपल्या मुलांच्या शिक्षणात सहभागी करून घेण्यासाठी गावात संध्याकाळचा एक अभ्यासगट सुरू करण्याबाबत चर्चा झाली. कोविडच्या काळात ही कल्पना बरीच परिणामकारक असल्याचे जाणवले होते. त्या काळात या संध्याकाळच्या अभ्यास गटामुळे मुलांना शिक्षक नसतानाही शिक्षण चालू ठेवता आले होते. साहजिकच आता मुलांच्या शिक्षणामध्ये अधिक मदत मिळवण्यासाठी हा गट पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला.

मुलांना आपापल्या वर्गात लहान-लहान गट करून शिकणे किंवा काम करणे या गोष्टीची सवय होती. वर्गातील शिक्षणामध्ये क्षमताधारित शिक्षणावर भर असल्याने, अध्ययन निष्पत्तीनुसार शिकवले जाते. मुलांना पीअर लर्निंग प्रोसेस आणि स्वअध्ययन

या गोष्टींची सवय होती. सध्याच्या अध्ययन पातळीनुसार त्यांची लहान गटांमध्ये विभागणी करण्यात आली. या प्रत्येक गटासाठी एक गटप्रमुख निवडण्यात आला. त्याने गटातील इतर मुलांना अभ्यासात मदत करायला सुरुवात केली. यामध्ये अगदी गरज पडेल तेव्हाच शिक्षकांनी मदत केली. या प्रक्रियेत गटप्रमुख केवळ स्वतः शिकले नाहीत तर आपल्या समवयस्कांनाही शिकवू लागले. यामुळे प्रत्येकाचा आत्मविश्वास वाढला. लवकरच, सर्व मुले एकमेकांना मदत करू लागली आणि ते करता–करता एकत्र शिकू लागली.

सुरुवातीला या अभ्यासगटात मुलांनी शाळेचा गृहपाठ पूर्ण करायला सुरुवात केली. त्यामुळे पालक त्यामध्ये लक्ष घालू लागले. त्याचप्रमाणे मोठ्या भावंडांनीही मदत केली. मुलांचे शिकणे आनंददायी होऊ लागले. शिक्षकांच्या प्रोत्साहनाने ती या अभ्यासगटांमध्ये स्पर्धा परीक्षांची तयारी करू लागली. स्पर्धा परीक्षेचे प्रश्न सोडवण्यासाठी ती विविध प्रयोग करून बघू लागली. यापुढे जाऊन शिक्षकांनाही आव्हानात्मक वाटणारे प्रश्न सोडवण्याचा ती प्रयत्न करू लागली. त्यांच्या या मेहनतीला उत्तम फळ मिळाले. एकूण एकतीसपैकी दोन विद्यार्थी नवोदय परीक्षेसाठी पात्र ठरले तर अठरा विद्यार्थी राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झाले.

या संपूर्ण प्रवासात शिक्षण विभाग आणि शाळेतील शिक्षकांनी तसेच ग्यानप्रकाश फाऊंडेशनने मार्गदर्शन व सहकार्य केले. शिक्षण प्रक्रिया सुव्यवस्थित करणे, समुदायाला मुलांच्या शिक्षणात सहभागी करून घेणे आणि मुलांना केंद्रस्थानी ठेवून आखलेल्या शिक्षणावर भर देणे यामुळे किती आश्चर्यकारक बदल होऊ शकतो हे या नांदगावच्या अनुभवातून स्पष्ट दिसून आले आहे.

## शनिवारच्या शाळेचे सरप्राइज



### बोलक्या चिठ्ठीचा उपक्रम

दर शनिवारी शाळेमध्ये अभ्यासाऐवजी मुलांचा एक सरप्राईज उपक्रम घेण्याची मिरखेलच्या जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांची पद्धत आहे. मुले या दिवसाची आतुरतेने वाट बघत असतात. त्यातलाच एक बोलक्या चिठ्ठीचा उपक्रम मुलांमध्ये वेगवेगळी कौशल्ये विकसित करण्यासाठी कसा उपयुक्त ठरू शकतो हे पाहू या.

### कसा घेतला जातो हा उपक्रम

यामध्ये चिठ्ठीवर विविध कृती आणि नावे लिहिली जातात. उदा.: आजी, आजोबा, शेतकरी, फेरीवाला, दुकानदार, भाजीवाली, वेडा, आई, बाबा, अधिकारी, शिक्षक, इत्यादी किंवा प्राण्यांची नावे जसे की – मोती कुत्रा, मनी मावशी, चिमणी. याखेरीज कविता, गीत, नृत्य, पाण्याचे महत्त्व, प्रदूषण, वाहनांची गर्दी, वृक्ष, सुविचार, म्हणी, विनोद, अशा काही कृतीदेखील त्यावर लिहिल्या जातात. मग या चिठ्ठ्या 'मी चिठ्ठी बोलते' नावाच्या बॉक्समध्ये ठेवल्या जातात.

यानंतर मुलांना गोलात बसवून चिठ्ठीचा बॉक्स फिरवला जातो. ज्याच्याकडे बॉक्स येईल त्याने त्यातून एक चिठ्ठी काढायची व त्यात लिहिल्याप्रमाणे कृती करायची, त्या व्यक्तीचा किंवा प्राण्याचा अभिनय करायचा, त्याविषयी बोलायचे किंवा व्यक्त व्हायचे.

**उपक्रमाविषयीची निरीक्षणे –** या खेळात प्रत्येकाला कृती करायची इच्छा असते. कोणीही नाही म्हणत नाही. अगदी शिक्षिकेसह प्रत्येकजण यात सहभागी होतो. एरवी अभ्यासाच्या तासात कमी बोलणारी मुले भरभरून बोलतात. कुणी प्राणी पक्ष्यांचे छान आवाज काढतात तर कुणी जणू खरोखरचे आजी–आजोबा होतात. कोणी विनोद सांगतात तर कोणी आजीकडून ऐकलेले गाणे किंवा ओवी म्हणतात. फेरीवाला किंवा भाजीवालीची नक्कल तर खूपच रंगते. आनंदी वातावरणात आणि हसत खेळत दोन–तीन तास कसे संपतात कळतच नाही.

मुलांच्या नवनवीन कल्पना, नंतर आठवलेल्या गोष्टी यांची बॉक्समधल्या चिठ्ठ्यांमध्ये भर पडत जाते. त्यामुळे दरवेळेस हा खेळ अधिक रंजक होत जातो.

**श्रीमाळी एस.व्ही.**
*जि. प. प्रा. शा. मिरखेल*

## गावाच्या मदतीने प्रयोगशाळेची उभारणी



ही गोष्ट आहे परभणी जिल्ह्यातील पोहंडूळ या गावातली. तेथील जिल्हा परिषद शाळेतल्या तुषार वंजारी या विज्ञानशिक्षकांना शिकताना स्वतः प्रयोग करून बघण्याचे महत्त्व लक्षात आले होते. त्यांच्या शाळेत इयत्ता सातवीपर्यंतचे वर्ग आहेत; परंतु मुलांना विज्ञानाचे प्रयोग करून पाहाण्यासाठी प्रयोगशाळा मात्र नाही. समजा, वेगवेगळ्या पदार्थांचे निरीक्षण करून त्यांचे वर्गीकरण करता

येणे अशी अध्ययन निष्पत्ती असेल तर, ते पदार्थ प्रत्यक्ष बघून, हाताळायला मिळाले तरच ही निष्पत्ती साध्य होऊ शकते. तेव्हा प्रात्यक्षिक करायला मिळल्याशिवाय विज्ञान शिकणे शक्य नाही या विचाराने आपल्या विद्यार्थ्यांसाठी एक लहानशी प्रयोगशाळा उभारावी असे तुषार वंजारी यांनी ठरवले. शासनाकडून त्यांना प्रयोगशाळेसाठी काही साहित्य पुरवण्यात आले होते. त्यामुळे आवश्यक ती साधने त्यांच्याकडे होती. आता हे साहित्य ठेवायचे कुठे आणि कसे हा प्रश्न उपस्थित झाला. तुषार वंजारी यांनी शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये हा प्रश्न मांडला. व्यवस्थापन समितीमधल्या लोकांना ताबडतोब याचे महत्त्व लक्षात आले. त्यांनी यासाठी सर्व प्रकारे सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. मग त्यांनी प्रयोगशाळेसाठी आवश्यक असणारी जागा, रॅक्स, या गोष्टी मिळवून देण्यासाठी मदत केली.

सूक्ष्मदर्शक, विविध रसायने, स्टारफिश इ. सजीवांचे नमुने, इतर बारीक सारीक वस्तू यांसह प्रयोगशाळा सुसज्ज झाली. स्वतः वंजारी सरांनी विविध शास्त्रज्ञांची माहिती देणारे तक्ते आणून ते लावले. तसेच विज्ञानाशी संबंधित इतर काही तक्तेही लावले.

सुरुवातीला फक्त पाचवी, सहावी, सातवीच्या मोठ्या मुलांसाठी प्रयोगशाळा उपयुक्त ठरेल असे वाटत होते. नंतर मात्र वंजारी सरांनी पहिलीपासूनच्या मुलांना यामध्ये सामील करून घ्यायचे ठरवले. त्यांना प्रयोग करणे कदाचित जमणार नाही पण विविध साधनांची, प्रयोगशाळा या संकल्पनेची माहिती करून घेता येईल असे वाटले. पुढे जाऊन प्रयोगशाळा कशी असते, तिथे कसे काम चालते, कशाप्रकारची साधने तिथे वापरली जातात हे लक्षात आले तर मुलांमध्ये हळूहळू विज्ञानाची आवड निर्माण होईल, त्यातूनच पुढे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी काम करता येईल असे त्यांच्या लक्षात आले.

एकंदर स्वतः शिक्षकांची तीव्र इच्छाशक्ती, अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी काय करता येईल याविषयी त्यांनी केलेला विचार, त्यानुसार आखलेली योजना आणि शाळा व्यवस्थापन समितीसारख्या प्रक्रियेतून मिळालेला लोकसहभाग आणि समुदायाचे सहकार्य या सर्व गोष्टींमुळे पोहंडूळ गावात एक उत्तम प्रयोगशाळा उभी राहू शकली.





## वाचक म्हणतात...



**विवेक मुंडे-जवळेकर**
*उपसरपंच ग्रा.पं. डोंगरजवळा,*
*ता. गंगाखेड, जि. परभणी*

नवीन शैक्षणिक धोरण हे मुलांच्या शिक्षणात सहभागी असलेल्या सर्व घटकांची जबाबदारी निश्चित करते.ग्रामपंचायतीची शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत खूप मोलाची भूमिका असते. शाळा ही शालेय व्यवस्थापन समितीची जबाबदारी आहे असे म्हणून ग्रामपंचायतीला बाजूला होता येणार नाही कारण ग्रामपंचायत शाळेला भौतिक सुविधेच्या माध्यमातून खुप मजबूतीने उभी करू शकते. आपल्या वार्षिक आराखड्यात शाळेतील महत्त्वपूर्ण गरजांचा समावेश करण्यासाठी ग्रामपंचायतीला शालेय व्यवस्थापन समितीसोबत सकारात्मक समन्वय ठेवणे आणि जोडून राहाणे खूप गरजेचे आहे.गावातील प्रत्येक मूल शिकण्यासाठी गावामध्ये शैक्षणिक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. शाळेला सर्वांगीण विकासाकडे घेऊन जाण्यामध्ये ग्रामपंचायतीचा मोठा वाटा असतो..!

## थोडा विचार करु या!

**अंमलबजावणी – पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अभियानाची**

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अभियान राबवण्यासाठी केंद्र सरकारने जी मार्गदर्शिका उपलब्ध करून दिली आहे, त्यामध्ये प्रकरण १४ हे समाज, पालक आणि ग्रामपंचायत यांच्या शैक्षणिक बदलासाठीच्या भूमिकेविषयी भाष्य करते. अर्थात मुलांच्या शिक्षणात पालकांची आणि समाजाची भूमिका हा विषय काही नवीन नाही, आणि कोणी अमान्यही करणार नाही. मात्र या अभियानाच्या निमित्ताने यावर चर्चा करणे आणि नेमकेपणाने समजून घेणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण क्षेत्राचा विचार केला तर प्रत्येक गावात जिल्हा परिषदेची शासकीय प्राथमिक शाळा आहे. या शाळांच्या विकासाची जबाबदारी ग्राम पंचायतीची आहे. शाळेचा विकास म्हणजे फक्त मुलभूत सोयीसुविधा पुरविणे, एवढाच नाही. बहुतेकांना तेच अपेक्षित असलं तरी ग्रामपंचायतींची भूमिका यापलीकडेदेखील आहे.

आपल्या गावातील १००% मुलांची शाळेत नोंदणी झाली आहे का? गावातील मुले, म्हणजे गावात रहात असलेल्या कुटुंबातील ६ ते १४ वयोगटातील सर्व मुले शाळेत दाखल आहेत का? हे पाहाणे, गावात कामाच्या निमित्ताने मजूर कुटुंबे आली असतील, आणि गावाबाहेर, पण गावाच्या हद्दीत रहात असतील तर त्यांचीही सदर वयोगटातील मुले शाळेत दाखल करणे हे ग्रामपंचायतीचे काम आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यामध्ये मजुरांच्या स्थलांतराचे प्रमाण मोठे आहे. मजुरांसोबत त्यांच्या मुलांचे स्थलांतर होऊ नये यासाठी आधीपासूनच तयारी करायला हवी. त्यांना आपल्या गावातच काम मिळेल यासाठी रोजगार निर्मिती होणे आवश्यक वाटते; पण हे शक्य नसेल तर त्यांची शाळेत जाणारी मुले गावातच राहतील आणि नियमित शाळेत जातील याची निश्चिती व्हायला पाहिजे. यामध्ये ग्रामपंचायतीची भूमिका महत्वाची आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे शाळेतील सर्व मुले अपेक्षेप्रमाणे शिकत आहेत का? हे पाहाणे आवश्यक आहे. निपुण भारत मिशनमध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान कार्यक्रमांतर्गत मुलांच्या 'शिकण्याविषयी' ग्रामपंचायतींची भूमिका नेमकेपणाने विषद केली आहे. मुलांना शाळेत शिकण्यासाठी आवश्यक सर्व सोयीसुविधा, साधने, शालेय साहित्य, मुलांच्या संख्येच्या प्रमाणात उपलब्ध आहे का? याची खात्री करणे, नसेल तर तशी व्यवस्था करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीने घेणे गरजेचे आहे.

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान कार्यक्रमानुसार शिक्षकांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती नियमितपणे बघावी. विषय, क्षमता आणि घटकानुसार प्रत्येक विद्यार्थ्याची संचयिका तयार करून त्यामध्ये नियमित नोंदी ठेवाव्या. प्रत्येक विद्यार्थी शिकण्याच्या कोणत्या टप्प्यावर आहे, त्याने कोणत्या गोष्टी आत्मसात केल्या आहेत आणि त्याला नक्की कशासाठी मदत करण्याची आवश्यकता आहे, हे त्यामुळे कळू शकेल. आपल्या पाल्याला त्याच्या वर्गाच्या किंवा वयाच्या अनुषंगाने कोणते ज्ञान, शैक्षणिक क्षमता, कौशल्ये येणे अपेक्षित आहे, हे पालकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी शिक्षकांनी घ्यावी. त्यासाठी वर्गनिहाय पालकसभा हे उत्तम माध्यम आहे.

अशा प्रकारे शाळेच्या बाहेर मुलांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षमता विकासाठी पालक आणि पर्यायाने संपूर्ण समाज काम करू शकतो. यासाठी शिक्षकांच्या मदतीने मुलांचे शैक्षणिक मूल्यमापन करणे, त्याआधारे शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने उपाययोजनांची अंमलबजावणी करणे महत्वाचे आहे.

मधुकर माने,
ग्यानप्रकाश फाउंडेशन

## मुलांच्या नजरेतून



**आयुष सुधाकर आडे,** इयत्ता-६ वी,
जिल्हा परिषद शाळा मांडवा, तालुका परभणी.




**कु. रूपाली बालासाहेब रासवे,** इयत्ता ७ वी,
जि.प प्रा शा . नागरजवळा, ता . मानवत जि परभणी




**कु. रूपाली बालासाहेब रासवे,** इयत्ता ७ वी,
जि.प प्रा शा . नागरजवळा, ता . मानवत जि परभणी



**राजकन्या पांडुरंग होगे,** इयत्ता - ८वी,
जि .प . प्रा .शा .नागरजवळा, ता. मानवत जि. परभणी

## ग्यानप्रकाश फाउंडेशन संस्थेविषयी

प्रत्येक विद्यार्थी ज्या वातावरणात शिकतो तिथे त्याला दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे. तो त्याचा मूलभूत हक्क आहे. शिक्षण व्यवस्थेतील अंतिम घटकापर्यंत म्हणजेच विद्यार्थ्यांपर्यंत शासनाच्या शैक्षणिक धोरणांचे परिणाम पोहोचावेत आणि त्याकरता ही धोरणे प्रभावी पद्धतीने राबवली जावीत या उद्देशाने ग्यानप्रकाश फाउंडेशन काम करते. हे उद्दिष्ट साध्य करण्याकरता शिक्षक, समाज आणि प्रशासकीय यंत्रणा सक्षम असायला हवी. शिक्षकांची क्षमता बांधणी आणि शाळांमधील मासिक नियोजन करण्यासाठी शिक्षण परिषद, शाळेची उद्दिष्टे साध्य करताना समुदायाचा सहभाग मिळवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती आणि शाळेच्या गरजा ग्रामसभेमध्ये मांडून आवश्यक ती मदत मिळवता यावी यासाठी शैक्षणिक ग्रामसभा या तीन महत्त्वाच्या प्रक्रिया अधिकाधिक परिणामकारक होणे आवश्यक आहे. यासाठी ग्यानप्रकाश वरील तीनही घटकांना सोबत घेऊन काम करत आहे.

सध्या महाराष्ट्रातील तीन विभागांमध्ये मिळून चौदा जिल्ह्यांमध्ये आणि शासकीय यंत्रणेबरोबर समन्वय साधत संपूर्ण महाराष्ट्रात ग्यानप्रकाश फाउंडेशन काम करत आहे. यातून सुमारे पंधरा हजार शाळा जोडल्या गेल्या असून अठ्ठयाऐंशी हजार शिक्षक आणि सतरा ते अठरा लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता आले आहे.